put in e-office

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

क्र.नपप्रसं २०२५/वि.रस्ता अनुदान /प्र.क्र./कक्ष-७/7776 दिनांक- 17 OCT 2025

वाचा :-

१. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६/नवि-१६दिनांक :-२१ मार्च,२०२५.
२. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)/नवि-१६दिनांक :-२८ मार्च,२०२५.
३. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-४)/नवि-१६दिनांक :-२९ मार्च,२०२५.
४. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-६)/नवि-१६ दिनांक :-३१ मार्च,२०२५.
५. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)/नवि-१६दिनांक :-४ एप्रिल,२०२५.
६. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-४)/नवि-१६दिनांक :-७ एप्रिल,२०२५.
७. नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-६)/नवि-१६ दिनांक :-४ एप्रिल,२०२५.
८. शासन निर्णय क्रमांक-रस्ताअ-२०२२/प्र.क्र.६६(ब-८२)/नवि-१६(ई-७०२९२५) दिनांक :- २६ सप्टेंबर,२०२५.
९. शासन निर्णय क्रमांक-रस्ताअ-२०२४/प्र.क्र.१३३(भाग-५)/ब-२/नवि-१६(ई-१०७९८३४) दिनांक :-२६ सप्टेंबर,२०२५.

**राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायत यांना सन २०२४-२०२५ साठी "विशेष रस्ता अनुदान" लेखाशीर्ष (३०५४००२२) या योजनेंतर्गत VPDA प्रणाली अंतर्गत आहरीत केलेल्या निधीमधून रक्कम रु.१,३०,००,०००/- (रुपये एक कोटी तीस लाख फक्त) निधी वितरीत करण्याबाबत आदेश क्र.४.**

वाचा मधील शासन निर्णय क्र. १ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी "विशेष रस्ता अनुदान" लेखाशीर्ष (३०५४००२२) या योजनेंतर्गत **VPDA प्रणाली** अंतर्गत राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका /नगरपंचायत यांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार संबधित महानगरपालिका / नगरपालिका /नगरपंचायत यांना निधी वितरीत करण्याकरिता नगरपरिषद प्रशासन संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त वाचा मधील क्र.८ ते ९ च्या शासन निर्णयान्वये खालील नमूद नगरपालिका यांना "विशेष रस्ता अनुदान" लेखाशीर्ष (३०५४००२२) या योजनेंतर्गत **VPDA प्रणाली अंतर्गत या योजनेच्या आहरीत केलेल्या** निधीमधून शासन स्तरावरून संबधितांना निधी वितरीत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर निधी वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण १०.०/प्र.क्र.१२८/अर्थोपाय ,दिनांक ६ जून, २००८मधील तरतुदी प्रमाणे खर्च करणे बंधनकारक राहील असे संदर्भ क्र. ८ ते ९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.खाली नमूद करण्यात आलेल्या परिशिष्ट -अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या नगरपरिषदेस "विशेष रस्ता अनुदान" लेखाशीर्ष (३०५४००२२) या योजनेंतर्गत वाचा मधील क्र. ८ ते ९ च्या शासन निर्णयान्वये **रक्कम रु.१,३०,००,०००/-(रुपये एक कोटी तीस लाख फक्त)** वितरीत करावयाचा निधी संबंधित जिल्हाधिकारी/जिल्हा सह आयुक्त यांना वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| |
|---|
| **परिशिष्ट-अ** |
| **आदेश क्र.४** |

| राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायत यांना विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत 3054 0022 या लेखाशीर्षाखाली VPDA प्रणाली अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी निधी वितरण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | नगरपरिषद /नगरपंचायत नांव | निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय | आदेश क्रमांक व दिनांक | रक्कम रु.(आकडे अंकात) | रक्कम रु. (आकडे अक्षरात ) |
| 1 | नाशिक | येवला | जिल्हाधिकारी/जिल्हा सह आयुक्त ,नाशिक | शासन निर्णय क्रमांक-रस्ताअ-२०२२/प्र.क्र.६६(ब-८२)/नवि-१६(ई-७०२९२५) दिनांक :- २६ सप्टेंबर,२०२५ | 35,00,000.00 | रुपये पस्तीस लाख लाख फक्त |
| | एकूण रक्कम रु.(अ) | | | | 35,00,000.00 | रुपये पस्तीस लाख लाख फक्त |
| 2 | जळगाव | अमळनेर | जिल्हाधिकारी/जिल्हा सह आयुक्त, जळगाव | शासन निर्णय क्रमांक-रस्ताअ-२०२४/प्र.क्र.१३३(भाग-५)/ब-२/नवि-१६(ई-१०७९८३४) दिनांक :-२६ सप्टेंबर,२०२५ | 95,00,000.00 | रुपये पंच्याण्णव लाख फक्त |
| | एकूण रक्कम रु.(ब) | | | | 95,00,000.00 | रुपये पंच्याण्णव लाख फक्त |
| | एकूण रक्कम रु.(अ)+(ब) | | | | 1,30,00,000.00 | रुपये एक कोटी तीस लाख फक्त |

शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हाधिकारी/जिल्हा सह आयुक्त यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्रांची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपले कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे )
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबंधित विभागीय सह आयुक्त, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय.
४. संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद.